महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १४ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## लक्षवेधी

## मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी लढा!

### दादरच्या शिवाजी मंदिरात रविवारी शाळा परिषद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : ठरवून बंद पडल्या जाणाऱ्या मराठी शाळांचा मुद्दा राज्याच्या व्यापक पटावर यावा, तसेच मराठी शाळांविरोधात सुरू असलेले कारस्थान रोखण्यासाठी मराठी अभ्यास केंद्राने पुढाकार घेतला आहे. यासाठी रविवार, १४ डिसेंबर रोजी दादरमधील श्री शिवाजी मंदिरात मराठी शाळांची दयनीय स्थिती व त्यावरील उपाययोजनांवर उहापोह करण्यात येणार आहे. तसेच, या परिषदेत मराठी शाळा बंद पाडण्याविरोधातील आंदोलनाची पुढची दिशा ठरविण्यात येणार आहे.
गेल्या अनेक वर्षांपासून मराठी शाळांना उतरती कळा लागली असून शाळा बंद पडण्याचे सत्र सुरू आहे. मराठी शाळांचे इंग्रजी माध्यम करून मराठी शाळा बंद केल्या जात असल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. बहुचर्चित न्यू माहीम शाळेमुळे पुन्हा मराठी शाळांचा प्रश्न ऐरणीवर आला. मराठी शाळांची सातत्याने सुरू असलेली गळचेपी रोखण्यासाठी मराठी अभ्यास केंद्राने आता आक्रमक भूमिका घेतली आहे.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचारी होणार कायम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत दहा वर्ष सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून करण्यासंदर्भात येत्या मार्चपर्यंत सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात येत असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य खात्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान दिली. सुधीर मुनगंटीवार यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. सर्व कर्मचाऱ्यांना दर महिन्याला पगार होईल याची काळजी घेण्यात येणार आहे. त्यासाठी यंत्रणा अद्ययावत करण्यात आलेली आहे. यासोबतच वैद्यकीय बिलांसाठी आता ऑनलाइन पद्धत राबवण्यात येईल अशी माहिती देखील आबिटकर यांनी यावेळी दिली.
राज्यात सर्व जिल्ह्यात उमेद मॉल
राज्यात सर्व जिल्ह्यांमध्ये महिलांसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी उमेद मॉल उभारण्यात येतील, त्यासाठी 200 कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला असून येत्या वर्षभरात त्यातील 10 मॉल उभारण्यात येतील अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबतच्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. याबाबतचा मूळ प्रश्न राणा जगजीत सिंग पाटील यांनी उपस्थित केला होता. त्यावर मुरजी पटेल, विजय वडेट्टीवार, योगेश सागर आदींनी उपप्रश्न विचारले.
राज्यात पंधरा हजार शिक्षकांच्या जागा रिक्त
राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या 15,158 इतक्या जागा रिक्त असून त्यासाठीची पदभरती प्रक्रिया लवकरच राबवली जाईल अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या संदर्भातील प्रश्नाच्या उत्तरात दिली.
याबाबतचा मूळ प्रश्न मोहन मते यांनी उपस्थित केला होता, त्यावर विजय वडेट्टीवार, नाना पटोले, नमिता मुंदडा आदींनी उपप्रश्न विचारले. आतापर्यंत 66 हजार शिक्षकांच्या बदलीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, मात्र बदली धोरण नव्यानं आणण्याचा विचार सुरू आहे. मे महिन्यापर्यंत ही बदली प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी ग्वाही देखील मंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी दिली.

## 'दगडी जातं' नामशेषाच्या वाटेवर

### वडार समाजाचा पोटापाण्याचा प्रश्न निर्माण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

: ग्रामीण आणि आदिवासी खेड्या-पाड्यात 'दगडी जातं' हे केवळ धान्य दळण्याचे साधन नाही, तर पहाटेची चाहूल, घराघरातील गजबज, स्त्रियांच्या ओव्या, श्रम आणि संस्कृती यांचा अतूट संगम आहे. पहाटे गावभर ऐकू येणारी जात्याची घरघर हीच दिवसाची सुरुवात असते. कोंबड्याच्या बांगेला, गोठ्यातील गाय-खिल्लारांच्या स्वरांना आणि दवबिंदू झळकणाऱ्या प्रकृतीसोबत जात्याची लय जणू निसर्गालाही जागवत असते, परंतु आज हे सारे दृश्य विस्मृतीत जात आहे. 'दगडी जातं' आता कालबाह्य होत असून, अंतिम घटका मोजत आहे.

# झोपडपट्टीमुक्तीसाठी सरकारचे मोठे पाऊल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई** : मुंबई झोपडपट्टी मुक्तीसाठी सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पामधील लाभार्थ्यांना दिलासा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी 17 ठिकाणी एसआरए समुह पुनर्विकास प्रकल्पाच्या घोषणेसोबतच 'एसआरए अभय योजने'ला डिसेंबर 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्र्यांनी काय घोषणा केल्या वाचा सविस्तर.
एसआरए अभय योजने'ला डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबरोबरच तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी 'एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटींची संख्या वाढविण्याच्या घोषणांचा समावेश आहे. त्याचबरोबर म्हाडाच्या ओसीसाठीच्या अभय योजनेला 1 वर्षाची मुदतवाढ आणि मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवरील महापालिका कर्मचाऱ्यांनी बांधलेल्या घरांकरीता नवीन योजना करण्याची घोषणा देखील त्यांनी केली.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, 50 एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात मुंबईतील अँटॉप हिल, कृष्ण नगर आणि केतकीपाडा (बोरिवली), गोपीकृष्ण नगर (दहिसर), ओशिवरा, गोवंडी, चित्ता कॅम्प (ट्रॉम्बे), चेंबूर, टागोर नगर (विक्रोळी), विक्रोळी पार्कसाईट, भांडुप या 17 प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.
यासंदर्भात निवेदन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुंबईतील 50 एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे पुनर्विकास केला जाणार आहे. छोट्या-छोट्या एसआरए प्रकल्पांऐवजी आता संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यासाठी ही योजना राबवली जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेला राज्य मंत्रिमंडळाने 7 ऑक्टोबर 2025 रोजी मान्यता दिली असून, 13 नोव्हेंबर 2025 रोजी याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.
हे प्रकल्प रखडू नयेत आणि जलदगतीने पूर्ण व्हावेत, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी, एमएसआरडीसी, म्हाडा आणि मुंबई महानगरपालिका या शासकीय संस्थांच्या मदतीने 'जॉइंट व्हेंचर' तत्त्वावर हे प्रकल्प उभारले जाणार असल्याचे

**मुंबईत ५० एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर राबवणार 'क्लस्टर रिडेव्हलपमेंट' राबवणार असून पहिल्या टप्प्यात 17 प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत घोषणा केली आहे.**

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.
प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी काही प्रकल्प हाती घेतले जाणार असून त्यामुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलण्यास आणि सुनियोजित शहरे वसण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.
एसआरए अभय योजने'ला 31 डिसेंबर 2026 पर्यंत मुदतवाढ
मुंबईतील हजारो झोपडीधारकांसाठी दिलासा देताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी झोपडी खरेदी-विक्रीच्या तांत्रिक अडचणीत अडकलेल्या नागरिकांसाठी 'एसआरए अभय योजने'ची मुदत आता डिसेंबर 2026 पर्यंत वाढविण्याची घोषणा केली.
अनेक झोपडीधारकांनी आपल्या झोपड्यांची खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण केले होते. मात्र, नियमानुसार या नवीन झोपडीधारकांचे नाव 'अंतिम परिशिष्ट-2' मध्ये (पात्र झोपडीधारकांच्या यादीत) समाविष्ट करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. यामुळे हजारो गरीब कुटुंब हक्काच्या घरापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे राज्य शासनाने 1 ऑक्टोबर 2024 रोजी 'अभय योजना' लागू केली होती. सुरुवातीला ही योजना 3 महिन्यांसाठी होती नंतर तिला मार्च 2025 पर्यंत मुदतवाढ दिली होती. यासोबतच म्हाडाच्या ओसी साठीच्या अभय योजनेला देखील सध्या सुरू आहे. १ वर्षाची मुदतवाढ देण्याची घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी केली.
एसआरए प्रकल्पाच्या तक्रार निपटाऱ्यासाठी एजीआरसीची संख्या वाढविणार
झोपडपट्टी पुनर्विकासाशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी असलेल्या 'एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटी'ची (AGRC) संख्या वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. सद्यस्थितीत 2103 प्रकरणे प्रलंबित असून त्यांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी एजीआरसीची संख्या वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात लहान मुलं बेपत्ता होण्याचे प्रमाण लक्षणीय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**मुंबई** : महाराष्ट्रात लहान मुलं पळवण्याच्या आणि बेपत्ता होण्याच्या वाढत्या गंभीर समस्येकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले आहे. मुख्यमंत्र्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात राज ठाकरेंनी या संकटाची आकडेवारी देत, राज्य सरकारने ठोस आणि कठोर पाऊले उचलण्याची मागणी केली आहे.
राज ठाकरेंनी पत्रात काय म्हटलं आहे?
राज ठाकरे यांनी राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीचा हवाला देत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी पत्रात नमूद केलं आहे की, महाराष्ट्रात लहान मुलं पळवण्याचं, ती बेपत्ता होण्याचं प्रमाण वाढतं आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३० टक्क्यांनी वाढले आहे. लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. या टोळ्या सर्रास लहान मुलं पळवत आहेत आणि यावर सरकार काय कारवाई करत आहे हे समजत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.
भीक मागणाऱ्यांची डीएनए चाचणी करा
केवळ 'अमुक केसेस दाखल झाल्या आणि इतकी टक्के मुलं सुखरूप परत मिळाली' अशा सरकारी उत्तराची महाराष्ट्राला अपेक्षा नसल्याचं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. या समस्येवर त्वरित कृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. रस्त्यावर, स्टेशनवर, बसस्टँडवर भीक मागणाऱ्या लहान मुलांची गंभीर दखल घेण्याची मागणी त्यांनी केली आहे. "या मुलांसोबत असलेले लोक त्यांचे खरे आई-वडील आहेत की नाही, याचा तपास किंवा वेळ पडल्यास डीएनए चाचणी करावी," असे आदेश देण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.
विधिमंडळ अधिवेशनावर टीका
राज्यात लहान मुलं पळवली जात आहेत, तरुण मुली पळवल्या जात आहेत, महाराष्ट्रातल्या जमिनी पळवल्या जात आहेत, यावर विधिमंडळात चर्चा व्हावी, त्यावर एकमुखाने काही पाऊलं उचलायला प्रशासनाला भाग पाडावं

### राज ठाकरेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र

असं सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना वाटत नाही का? असा सवाल ठाकरे यांनी केला आहे. हिवाळी अधिवेशन म्हणजे सरकारच्या चुकलेल्या अंदाजपत्रकाला ठिगळ लावण्यासाठी पुरवणी मागण्या मंजूर करून घेण्याची सोय इतकंच प्रयोजन आहे का? अधिवेशनात अनेकदा उत्तरं द्यायला मंत्री सभागृहात नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे लहान मुलं असोत की गायब होणाऱ्या मुली, अशा विषयावर विधिमंडळात चर्चा होईल, अशी अपेक्षा करणे पण अवाजवी वाटेल, अशी परिस्थिती आहे. केंद्र सरकारने हा विषय सगळ्या राज्यांशी बोलून या विषयात कृतिगट तयार करायला हवा, पण सध्या वंदे मातरम वर तावातावाने चर्चा करणाऱ्या केंद्र सरकारला मातांचा आक्रोश ऐकू येत असेल असं वाटत नाही, अशी टीका त्यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांना 'बळीराजा रस्ते' योजनेचा आधार

## मुंबईतील गृहनिर्माण संस्थांनाही मोठा दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या शेत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यासह, मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करणारे तसेच वर्ग २ च्या जमीनी वर्ग १ करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. असे महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत याबाबतची चार महत्त्वाची निवेदने सादर केली. दोन्ही सभागृहातील सदस्यांनी यासाठी महसूलमंत्र्यांचे अभिनंदन केले.
**मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना : शेतकऱ्यांना मोठा दिलासा**
ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही आणि मजबूत रस्ते उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागामार्फत 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.
**यंत्रसामुग्रीचा वापर** : शेतीतील यांत्रिकीकरण लक्षात घेऊन ही योजना पूर्णपणे यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने राबविली जाईल.
**अतिक्रमण निर्मूलन** : गाव नकाशावर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे या योजनेअंतर्गत त्वरित हटविली जातील.
. मोफत मोजणी व शुल्क माफी: या रस्त्यांसाठी लागणारी तातडीची मोजणी आणि पोलीस बंदोबस्त शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले आहे. तसेच, रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी लागणाऱ्या गाळ, माती, मुरूम किंवा दगडासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) आकारले जाणार नाही. खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले जाणार आहे.
आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विधानसभा क्षेत्रस्तरावर आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाचा मार्ग मोकळा
मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, त्यांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे.
अट रद्द : प्रधानमंत्री आवास योजनेसाठी वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाच्या (FSI) पैकी २५% चटईक्षेत्र उपलब्ध करून देण्याच्या अटीमुळे सोसायट्यांना योजनेचा लाभघेता येत नव्हता. आता स्वयंपुनर्विकास करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही २५% एफएसआयची अट वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यास मुदतवाढ
भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ (फ्री होल्ड) मध्ये सवलतीच्या दराने रूपांतर करण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे.
**नवीन मुदत** : ही सवलत योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती, ती आता एक वर्षाने वाढवून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे.
विलंबासाठी सवलत : न्यायालयीन प्रकरणे किंवा नियोजन प्राधिकरणाने विकास योजनेत केलेला बदल अशा कारणांमुळे जमिनीचा वापर करण्यास ५ वर्षांपेक्षा
जास्त विलंब झाला असल्यास, शासनाची खात्री पटल्यावर वापराबाबतची ५ वर्षांची अट शिथील करण्यात येईल.
खासगी संस्थांना रेडीरेकनरच्या १० टक्के तर स्वयं पूनर्विकासासाठी ५ टक्के निधी भरावा लागणार आहे.

## हरित लवादाकडून तपोवनातील वृक्षतोडीला स्थगिती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली** : नाशिक येथील तपोवनातील वृक्षतोडी विरोधात सर्वोच्च न्यायालयाचे कायदेतज्ज्ञ श्रीराम पिंगळे यांनी वृक्षकटाई स्थगित करण्यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात (एनजीटी) याचिका दाखल केली होती. लवादाने तत्काळ दखल घेतली आणि नाशिक महापालिकेला एकही झाड तोडू नये असे आदेश दिले. याशिवाय, वृक्षकटाईबाबत तपशीलवार अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले. नाशिकमधील तपोवन परिसरातील वृक्ष तोडीला स्थगित बाबतच्या आदेशाची हरित लवादाने या प्रकरणी नाशिक महापालिकेला आदेश दिला. या परिसरातील एकही वृक्ष तोडू नये, त्याच बरोबर वृक्षतोडी बाबतचा अहवाल तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत.
तपोवन परिसरातील वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाने १५ जानेवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. या अंतरिम स्थगितीनुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पालिकेला वृक्षतोड थांबविण्याचा आदेश दिला आहे. वकील श्रीराम पिंगळे यांनी सांगितले की, हरित लवादामध्ये नाशिकमधील तपोवनातील वृक्षतोडीच्या विरोधात याचिका दाखल झाली होती. हरित लवादाने तपोवनातील वृक्षतोडीला स्थगिती दिली आहे. हा अंतिम आदेश नाही तर अंतरिम आदेश आहे. पिंगळे पुढे म्हणाले की तपोवनातील झाडे तोडण्याआधी न्यायिक प्रक्रिया राबवायला हवी, असे आमचे मत आहे.
ती न राबवताच वृक्षतोड केली जात आहे. एकदा तोडलेल्या वृक्षांचे पुनर्रोपण नीट केले जात नाही, हा अनुभव आहे. नाशिक मनपा आयुक्तांच्या पत्रकार परिषदेत त्या अत्यंत बेजाबदार विधाने करताना दिसल्या. याप्रकरणाचे राज्यभर पडसाद उमटलेले असताना त्यांनी या वृक्षतोडीला केवळ १-२ जणांचा विरोध असल्याचे सांगितले. त्याचबरोबर झुडपे तोडणार असल्याचे सांगितले.
मात्र हजारो झाडे तोडण्याची पालिका तयारी करत आहे. जून, सप्टेंबर दरम्यान १२७० झाडे तोडण्याची परवानगी घेऊन ३०० झाडे एसटीपीच्या नावाखाली तोडली. याशिवाय इतर ठिकाणी १७ हजार झाडांचे वन उभारल्याचे सांगितले. मात्र त्याठिकाणी मृत झाडे आहेत.
हरित लवादाने स्पष्ट केले की कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय कोणतेही झाड तोडायचे नाही. त्यासाठी समिती नेमली आहे. त्या समितीला तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. आता वनअधिकाऱ्यांना सर्व हरकती ऐकाव्या लागतील. एवढ्या मोठ्या प्रमाणात होणारा विरोध त्यांना गृहीत धरावा लागेल. त्यानुसार त्यांना कारणमिमांसा सादर करण्यास सांगितले आहे.

## केईएममध्ये जागतिक दर्जाचे बर्न केअर युनिट सज्ज


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : केईएम रुग्णालयातील नूतनीकरण केलेल्या 'जळीत रुग्ण उपचार केंद्रा'चे शनिवारी शैलेश लिमडी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. केईएम रुग्णालयातील या केंद्रामध्ये महिला, बालकांसह पुरुष रुग्णांसाठी अद्ययावत अशी उपचार सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वर्षापोटी १५० ते १७० रुग्णांवर उपचार करण्याची या केंद्राची क्षमता आहे.






# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा



मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा. यांचा आज स्मृतिदिन. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# टिटवाळा महोत्सवात महापरिनिर्वाण दिनाची आगळीवेगळी आदरांजली

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** सहा डिसेंबर, शनिवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त टिटवाळा महोत्सवात सामाजिक जाणिवेची आणि विचारप्रबोधनाची अनोखी दिशा दिसून आली. नेहमीप्रमाणे डान्स, नृत्य, डीजे, ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमांचा मार्ग न अवलंबता, महोत्सव समितीने विचारांना केंद्रस्थानी ठेवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर महान महापुरुषांवर आधारित वकृत्व स्पर्धेचे आयोजन केले.

आकर्षक रोषणाई आणि संगीताऐवजी, टाळयांचा कडकडाट आणि तरुणाईच्या विचारपूर्ण उद्गारांनी आजचा टिटवाळा महोत्सव भारावून गेला. विद्यार्थ्यांनी वकृत्वाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार, संघर्ष आणि स्वप्नातील भारताची उभारणी याविषयी प्रभावीपणे प्रकाश टाकला.

कार्यक्रमानंतर अॅड. सागर वाकले पाटील यांनी "बाबासाहेबांना अभिप्रेत असणारा भारत" या विषयावर अतिशय प्रभावी, सारगर्भ व प्रेरणादायी व्याख्यान देत उपस्थितांना विचारप्रवर्तक संदेश दिला. समता, शिक्षण, सामाजिक न्याय आणि संविधानिक मूल्यांवर आधारित भारत उभारण्याचा बाबासाहेबांचा दृष्टिकोन त्यांनी अत्यंत प्रभावी शब्दांत मांडला.

टिटवाळा महोत्सव समितीने केलेली ही आगळीवेगळी संकल्पना— "गैरसोयींचा गोंगाट नव्हे, विचारांचा आवाज ठसा उमटवतो" — यातून बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने आदरांजली वाहण्यात आली.

टिटवाळा महोत्सवाने या उपक्रमातून समाजासमोर एक वेगळा आदर्श ठेवला आहे. मनोरंजनाच्या काळातही विचार, मूल्यं, संस्कार आणि बाबासाहेबांचे योगदान पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम महोत्सवाने उल्लेखनीय पद्धतीने पार पाडले.

# शालेय कर्मचाऱ्यांच्या अपघात विम्याचा हप्ता जिल्हा मध्यवर्ती बँकेने भरावा - शिक्षण क्रांती संघटनेची मागणी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सन २०२१-२२ वर्षापासून जिल्हा मध्यवर्ती बँक त्यांच्या बँकेतील पगार खातेदार असलेल्या शालेय कर्मचाऱ्यांचा अपघाती मृत्यू विमा उतरवित असते. मात्र यावर्षी विम्याचा हप्ता कर्मचाऱ्यांनी भरावा असे संचालक मंडळाकडून सांगण्यात आले. याबाबत दि 12 डिसेंबर 2025 रोजी संचालक मंडळाने बँकेचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संघटना प्रतिनिधींची सभा आयोजित केली होती. या सभेत शिक्षण क्रांती संघटनेच्या वतीने ज्ञानेश्वर गोसावी, राजेंद्र गवळी व अनिल मुरादे यांनी सहभाग घेऊन विम्याचा हप्ता बँकेने भरावा असा आग्रह अध्यक्षांकडे धरला.

अपघाती मृत्यू बरोबरच नैसर्गिक मृत्यू करीताही विमा योजना लागू करावी असे ज्ञानेश्वर गोसावी यांनी सांगितले तर उतरविलेल्या विम्याची एक प्रत संबंधित कर्मचाऱ्यांना मिळावी असा आग्रह राजेंद्र गवळी यांनी धरला. खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांना अन्य पर्याय उपलब्ध असताना सुमारे ८० टक्के कर्मचारी टीडीसीसी बँकेचे पगारदार खातेदार आहेत त्यामुळे या कर्मचाऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा असे अनिल मुरादे यांनी सांगितले.

सभेकरीता फक्त शिक्षण क्रांती संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकारी यांनी नम्रपणे व अभ्यासपूर्ण आपले म्हणणे अध्यक्षांना व संचालक मंडळासमोर मांडले आहे. त्यामुळे निश्चितच मागणी मान्य होईल असा विश्वास शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. अध्यक्ष राजेंद्र पाटील, संचालक राजेश पाटील, भाऊ कुऱ्हाडे, प्रशांत पाटील यांनाही सहकार्य करण्याचे आवाहन घागस यांनी केले आहे.

### गायन समाजातर्फे शास्त्रीय संगीतातील मानाच्या

# देवगंधर्व महोत्सवाने कल्याणकर मंत्रमुग्ध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** शतक महोत्सवी वर्षात पदार्पण केलेल्या कल्याण गायन समाजातर्फे साजरा होणाऱ्या व कल्याण डोंबिवलीचे भूषण असलेल्या, शास्त्रीय संगीतातील मानाच्या देवगंधर्व महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी झाली. आचार्य अत्रे रंगमंदिरात संपन्न होणाऱ्या देवगंधर्व महोत्सवाचे हे चोवीसावे वर्ष आहे. मागील तीन वर्षाप्रमाणे याही वर्षी भारतीय स्टेट बँकेचे प्रायोजकत्व देवगंधर्व महोत्सवाला लाभले आहे. तसेच मागील वर्षीप्रमाणे या ही वर्षी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा या महोत्सवास विशेष सहयोग मिळाला आहे.




कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल, देवगंधर्व महोत्सवाचे अध्यक्ष सेवा निवृत्त भा.प्र.से. सीताराम कुंटे, उपाध्यक्ष डॉ. नंजप्पा व माधव जोशी, कल्याण गायन समाजाचे अध्यक्ष डॉ संदीप जाधव, विश्वस्त नंदकुमार मुजुमदार, गायन समाजाचे पदाधिकारी राम जोशी, प्रशांत दांडेकर, स्वप्नील भाटे या सर्वांच्याहस्ते दीप प्रज्वलनाने महोत्सवाचे ऊद्घाटन झाले.

आघाडीचे सतार वादक उस्ताद शाहिद परवेझ खान यांच्या वादनाने महोत्सवाच्या पहिल्या सत्राचा श्रीगणेशा झाला. राग गावती मध्ये त्यांनी आपल्या वादनाला सुरुवात केली. आलाप, जोड, झाला अशा पारंपरिक पद्धतीने वादन पुढे गेले. विलंबित झपताल व द्रुत त्रिताल अशा दोन बंदिशी त्यांनी रसिकांसमोर मांडल्या. आपल्या वादनात

## कल्याण गायन समाजाच्या देवगंधर्व महोत्सवाला सुरवात

त्यानंतर त्यांनी यमन कल्याण रागातील दिपचंदीमधील रचना प्रस्तुत केली. आपल्या वादनाची सांगता करताना शाहिद परवेझ यांनी दादरा तालामधील आणखी एक मिश्र रचना सादर केली. त्यांना तबल्यावर तितकीच तोलामोलाची साथ पं विजय घाटे यांनी केली. या जोडीने श्रोत्यांचे कान, मन तृप्त केले आणि सगळं वातावरणच चैतन्यमय करून टाकलं.

दुसऱ्या सत्राचे मानकरी होते किराणा आणि ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पद्मश्री पं व्यंकटेश कुमार. त्यांनी सुरवातीला राग दुर्गा मधील "तुमबीन कोन प्यारे" ही विलंबित तिलवाडा तालातील चीज तर " माता भवानी काली" ही दृत त्रितालातील चीज सादर केली. त्रितालातीलच तराणा सादर करून दुर्गा रागाची सांगता त्यांनी केली. मैफिलीत त्यानंतर त्यांनी डमरू डम डम बाजे ही राग तिलककामोद मधील द्रुत त्रितालातील रचना गायली. मैफिलीच्या उत्तरार्धात कौशी कानडा रागातील 'राजन के राजा श्री रामचंद्र' ही विलंबित एकतालात तर "काहे करत मोसे बरजोरी" ही द्रुत त्रितालातील अशा रचना सादर केल्या.

राग भैरवीतील 'समझा मना कोई नाही अपना' या त्रितालातील रचनेने पंडितजींनी आपली मैफिल संपवली. पुरक तबला साथ मंदार पुराणिक यांनी केली तर सुरेल संवादिनी साथ सिद्धेश बिचोलकर यांची होती. शिवराज पाटील व नागनाथ नागेश यांनी तानपुऱ्यावर साथ दिली.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून 35,362 रुग्णांना 299 कोटींची मदत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात गेल्या वर्षभरात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सर्व सकारात्मक बदलांचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला असून, 6 डिसेंबर 2024 ते 6 डिसेंबर 2025 या कालावधीत राज्यातील 35 हजार 362 रुग्णांना 299 कोटी 43 लाख 52 हजार 400 वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात आली आहे.

कक्षाच्या वतीने गेल्या वर्षभरात हजारो गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत करण्यात आली. भविष्यात अधिकाधिक रुग्णांना मदत करता यावी, यासाठी त्रिपक्षीय करार, आरोग्य विषयक सर्व शासकीय योजनांचे एकत्रीकरण आदी उपक्रमांमधून गरजू रुग्णांसाठी मदतीचे मार्ग आणखी सुलभ होणार आहेत.

**जिल्हा कक्षाची स्थापना**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून लाभ मिळवण्यासाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पूर्वी मुंबईत यावे लागत असे. त्यामुळे वेळ आणि पैसा खर्च होत होता. ही अडचण कायमची दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हा कक्षाची स्थापना करण्यात आली.

**एफसीआरए प्रमाणपत्र**

या वर्षातील सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला मिळालेले एफसीआरए प्रमाणपत्र. ही परवानगी मिळवणारा महाराष्ट्रातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा भारतातील पहिला कक्ष ठरला आहे. यामुळे आता परदेशातून थेट देणग्या स्वीकारण्याची परवानगी मिळाली आहे.

आरोग्य योजनांचे एकत्रिकीकरण राज्यातील विविध आरोग्य योजनांचे एकत्रिकीकरण करण्यात येणार आहे. सर्व आरोग्यविषयक योजनांचा लाभ एकाच प्रणालीत उपलब्ध होणार आहे. पात्रता, कागदपत्रे आणि अर्जप्रक्रिया एकसंध झाल्याने रुग्णांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्यासोबतच निधी व रुग्णालयांमधील समन्वय वाढून मदत मिळण्याचा वेग वाढणार आहे. एकत्रित आरोग्य सहाय्य मॉडेलमुळे गरीब व गरजू नागरिकांना योग्य वेळी योग्य योजना मिळवणे अधिक सोपे होणार आहे.

**त्रिपक्षीय करार**

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा लाभ देता यावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून त्रिपक्षीय करार लवकरच करण्यात येणार आहे. यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कॉर्पोरेट कंपनी, रुग्णालय आणि काही प्रमाणात रुग्णांचे योगदान अपेक्षित असणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात वर्षभरात केलेल्या सुधारणा प्रत्यक्ष रुग्णांपर्यंत पोहोचल्या. ऑनलाइन प्रक्रिया सोपी करणे, जिल्हा कक्षांची स्थापना आणि इतर नवीन उपक्रमांमुळे हजारो रुग्णांना वेळेवर मदत मिळत आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणाचाही उपचार थांबू नये, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प पूर्ण क्षमतेने प्रत्यक्षात उतरतो आहे.

# रस्ता आपलाच समजून विरुद्ध दिशेने दुचाकींची वाहतूक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली:** विरुद्ध दिशेने वाहने येणाऱ्यांमुळे शहरात अपघाताची शक्यता आहे. पूर्वेला चिपळूणकर पथ, टिळक पथ, मंजूनाथ शाळेसमोर तसेच पश्चिमेला कोपर रस्त्यावरून दुचाकीस्वार विरुद्ध दिशेने येत असल्याने सरळमार्गी जाणाऱ्या वाहनांना अडथळा होत आहे.

चिपळूणकर रस्त्यावर बालभवन जवळ अनेकदा वाहतूक नियंत्रण पोलिस अशा दुचाकी चालकांवर कारवाई करतात. मात्र तेथे पोलिस नसल्याचे बघताच अनेक दुचाकीचालक त्या रस्त्यावरून विरुद्ध दिशेने जातात. मानपाडा रस्त्यावर शिवसेना मध्यवर्ती शाखेबाहेरील बाजूला संध्याकाळी पूर्ण वेळ वाहतूक पोलिस असतील तर अशा चालकांवर नियंत्रण मिळेल.

मंजुनाथ शाळेसमोर ही अशाच पद्धतीने मशाल चौकातून दुचाकी, रिक्षाचालक येतात. त्यामुळेही समस्यांत वाढ होते.

**वाहतूक पोलिसांचीही गरज**

**सिग्नल यंत्रणा इंदिरा गांधी चौक, चार रस्ता, टंडन रोड, पश्चिमेला कोपर उड्डाणपूल येथे असतात. परंतु वरील ठिकाणी पोलिस असतील तर कोंडी फुटेल आणि अपघात टळतील. नागरिकांच्या जीवाला धोका होणार नाही यासाठी सतर्कता म्हणून कारवाईची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**

त्यामुळे शाळकरी विद्यार्थी ज्येष्ठ नागरिकांना अडथळा होतो. तेथेही सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी वाहतूक पोलिसांची आवश्यकता आहे. मात्र पोलिस यंत्रणा तेथे कार्यरत नसल्याने दुभाजक काढून अनेकदा वाहनचालक सर्रास वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात. कोपर रस्त्यावरून उड्डाणपुलाकडे येताना ही विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहन चालकांमुळे अपघाताची शक्यता आहे. इंदिरा गांधी चौकात रिक्षाचालकांना अत्यावश्यक आहे. शिस्त लावणे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि होप मिरर फाउंडेशनतर्फे आरोग्य तपासणी शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आणि होप मिरर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शरद पवार यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त तळोजा फेज १ परिसरातील कपिला सोसायटी येथे भव्य मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. या आरोग्य उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांनी शरदचंद्र पवार यांच्या दशकांपासून चालत आलेल्या लोककल्याणकारी



कार्याच्या सन्मानार्थ केले.

शिबिरास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शिबिरात नागरिकांसाठी मोफत डोळ्यांची तपासणी करण्यात आली, तसेच ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि अपंग बांधवांसाठी चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. याशिवाय रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, वजन मोजणी, नेत्र तपासणी व अन्य सर्वसाधारण आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. आरोग्य शिबिरादरम्यान डॉक्टर व आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन देत आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्यावर विशेष भर दिला.

समाजातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार व मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची भूमिका आयोजकांकडून मांडण्यात आली. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक नागरिकांना तत्पर, मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळाली असून शिबिराबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता

| | |
|---|---|
| f | https://www.facebook.com/jeevandeepnews/ |
| Instagram | https://www.instagram.com/thane_jeevandeep/ |
| X | https://x.com/Jeevandeepvarta |
| www | https://jeevandeepvarta.com/ |

# भविष्यवेध



**रविवार**
**१४ डिसेंबर २०२५**

**मेष**
व्यवसायात गुंतलेल्या लोकांना आज चांगला नफा मिळेल. भरपूर कमाई होईल. चा दिवस जास्त नफा मिळवण्याचा आहे. आयुष्यात वडिलांकडून पाठिंबा मिळेल.

**वृषभ**
नियोजित काम करण्यासाठी आणि तुमच्या योजना पूर्ण करण्यासाठी चांगला आहे. नशिबाची साथ मिळेल, अडकलेली सगळी कामं आज पूर्ण होतील.

**मिथुन**
तुमच्या वैवाहिक जीवनात गोडवा येईल. या राशीच्या व्यावसायिकांना आज आराम मिळेल. मित्रांसोबत ट्रीपचा प्लान ठरेल. नवीन रोजगाराच्या संधी मिळतील.

**कर्क**
तुमचा दिवस नव्या उत्साहाने सुरू होईल. तुमच्या चांगल्या वागण्यामुळे तुम्हाला समाजात चांगली प्रतिष्ठा मिळेल. आर्थिक लाभ होईल.

**सिंह**
काहीतरी मोठे आणि वेगळे करण्याचा विचार करू शकता. तुमच्या वरिष्ठांच्या पाठिंब्याने तुमचे महत्त्वाचे काम पूर्ण होईल. देवाच्या भक्तीत दिवस जाईल .

**कन्या**
विद्यार्थ्यांचा दिवस आरामदायी असेल आणि ते नवीन वेळापत्रक तयार करण्याचा विचार देखील करू शकतात. ऑफिसमध्ये फोनचा वापर कमी करा.

**तुळ**
कामावर लक्ष केंद्रित करा.तुमच्या कारकिर्दीत यश मिळेल. व्यावसायिकांना चांगला आर्थिक लाभ होईल. वीकेंड छान आरामात जाईल.

**वृश्चिक**
खेळांमध्ये सहभागी असलेले लोक त्यांच्या प्रशिक्षणात सर्वोत्तम प्रयत्न करतील. कुरिअर व्यवसायात सहभागी असलेल्यांना आज फायदा होईल.

**धनु**
कोणासीही भांडू नका, नाहीतर दिवस खराब जाईल. व्यवसायात मोठा निर्णय घेण्यापूर्वी पूर्ण अभ्यास करा, अनुभवी लोकांचा सल्ला घ्या मगच गुंतवणूक घ्या.

**मकर**
संयम आणि समजूतदारपणा तुम्हाला तुमची कामे पूर्ण करण्यास मदत करेल. तुमच्यावर खांद्यावर अनेक जबाबदाऱ्या येऊ शकतील.

**कुंभ**
कुटुंबाकडून, विशेषतः वडीलधाऱ्यांकडून, प्रचंड पाठिंबा मिळेल जे तुमच्यावर प्रेम करत राहतील. तुमची मुले देखील तुमच्यावर खूश असतील.

**मिन**
कामाच्या ओझ्यामुळे थकायला होईल. पण पदोन्नतीची गुड न्यूजही मिळेल. आर्थिक स्थिती होईल मजूबत. जुने मित्र भेटल्याने आनंद वाढेल.

# रस्ता रुंदीकरण मोजणीला विरोध



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील विविध रस्त्यांवर रुंदीकरणाचे काम सुरू आहे. पहिला टप्प्यात १७ नोव्हेंबरपासून अंजूरफाटा ते कल्याण नाकादरम्यान दोन्ही मार्गिकेवर ३६ मीटर रस्ता रुंदीकरण पूर्ण केल्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात कल्याण नाका ते टेमघरदरम्यान रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. रुंदीकरणाला स्थानिकांचा सुरुवातीपासूनच विरोध आहे. त्यासाठी वेगवेगळ्या आंदोलन केले जात असताना पालिका प्रशासनाने रस्ता रुंदीकरणासाठी मालमत्तांना मोजणी करून मार्किंग करण्याचे काम सुरू केले आहे.रांजनोली बायपास येथून मोजणी करून मार्किंग करत असताना कल्याण नाका येथील स्थानिक मालमत्ताधारक, व्यावसायिक गाळेधारक आणि निवासी नागरिकांनी टेमघर येथे एकत्र येत जोरदार विरोध करत काम थांबविले. त्यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर अधिक पोलिस दाखल होत येथील परिस्थिती शांत केली. रस्ते मोजणी करून मार्किंग करण्याचे काम सोमवारपासून चोख पोलिस बंदोबस्त घेऊन पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती शहर विकास अधिकारी समीर आतरे यांनी दिली.

# डोंबिवली एमआयडीसीत गुलाबी रस्ता

**रासायनिक गाळाच्या ढिगावर पाणी मारल्यामुळे डोंबिवलीतील रस्ता गुलाबी झाला असून या भोंगळ कारभारावर रहिवासी आणि राजकीय नेत्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील टप्पा दोन भागात एक रस्ता शनिवारी सकाळी गुलाबी झाल्याने या भागातील प्रदुषणाचा विषय पुन्हा चर्चेला आला. यापूर्वी हिरवा पाऊस, लाल रस्ता असे प्रदुषणाचे अनेक प्रकार डोंबिवली एमआयडीसीत घडले आहेत. आता गुलाबी रस्त्याचा विषय चर्चेला आल्याने या प्रदुषण प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कल्याण विभागाने एमआयडीसी आणि संबंधित ठेकेदाराला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.



एमआयडीसीच्या टप्पा दोन भागमध्ये मालवण किनारा हॉटेल समोरील रस्त्यावर शनिवारी सकाळी अचानक गुलाबी रस्ते दिसू लागल्याने या भागातील उद्योजक, परिसरातील रहिवाशांमध्ये अनेक शंका उपस्थित झाल्या. यापूर्वी या परिसरात गुलाबी पाऊस, हिरवा पाऊस पडल्याने रस्ते गुलाबी, हिरवे झाले होते. त्यानंतर लाल रस्ते, लाल नाले पाहण्यास मिळाले होते.

या प्रदूषण प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी संबंधित कंपन्या, एमआयडीसीला नोटिसा पाठविल्या होत्या. त्यामुळे मागील चार ते पाच वर्षात हे प्रदुषणाचे प्रमाण कमी झाले होते-या भागाची नियंत्रक कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (कामा) डोंबिवली एमआयडीसीतील कंपन्यांनी प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. आणि चोरूनलपून कोणी गटारात प्रक्रिया न करता रंगीत पाणी सोडणे, हवेत गॅस सोडण्याचे प्रकार केले तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कामा संस्थेने पुढाकार घेतला. त्यामुळे गेल्या चार ते पाच वर्षात एमआयडीसीतील प्रदूषण आटोक्यात आले आहे. शनिवारी एमआयडीसी मधील मालवण किनारा हॉटेल समोरील रस्त्यावर गुलाबी रस्ते दिसू लागले. पाच वर्षापूर्वी याच भागात रस्ता गुलाबी झाला होता. रस्ते गुलाबी झाल्याचे समजताच एमआयडीसी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी उपेंद्र कुलकर्णी, क्षेत्रीय अधिकारी राजेश नांदगावकर यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यावेळी त्यांना एमआयडीसीकडून या भागातील गटारातील गाळ बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. या गाळाचे ढिग रस्त्याच्या किनारी

ठेवण्यात आले आहेत. शनिवारी सकाळी परिसरातील कंपनीतील कामगाराने रस्त्यावर पाणी मारताना या रस्त्यावरील ढिगांवर पाणी मारले. ढिगांमधील रासायनिक घटक पाण्यात मिसळल्याने रस्ता लाल होत गेला. पाणी मारणाऱ्या कामगाराने रस्ता गुलाबी होत असताना पाणी मारणे थांबविले नाही. त्यामुळे ढिगांमधील रासायनिक घटक रस्त्यावर पसरले. आणि रस्ता गुलाबी झाला.

# कल्याण पश्चिमेत कचऱ्याचे ढीग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिम गोदरेज हिल रोड लगत अनेक सोसायट्यांमधील कचरा महापालिकेच्या माध्यमातून उचलला जात नाही. अशा सोसायटीमधील कचरा साठविण्याचे डबे व अन्य साधने कचऱ्याने तुडुंब भरले आहेत. त्यामुळे रस्त्यावर कचरा जमा होत असल्याने या परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

# भिवंडीत जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : जुगार अड्ड्यावर पोलिसांनी केलेल्या कारवाईत दहा जणांविरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला. खोणी खाडीपार परिसरात खाडी पुलाजवळ समीर सर्व्हिस सेंटरच्या जवळ जुगार अड्ड्यावर निजामपूर पोलिसांनी कारवाई केली. रजबअली अन्सारी, मुस्तीकीन अब्दुल मजीद अन्सारी, गणेश देवनार, परवेज मुस्तफा अन्सारी, मेहंदर यादव, मुर्तुजा जमाल शेख, सुभाष यादव, असे जुगार खेळताना आढळले.

# उल्हासनगरात ई-सिगारेटचा साठा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : कॅम्प नं-३, कपडा मार्केट, सीएचएम कॉलेज रोडवर, स्टेशन रोड येथील शॉपिंग हब या दुकानातून ई-सिगारेटचा साठा गुरुवारी सायंकाळी सात वाजता जप्त केला. याप्रकरणी मध्यवर्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर अवताडे यांनी दिली. ई-सिगारेटची विक्री केली जात असल्याची माहिती मध्यवर्ती पोलिसांना मिळाली होती. गुरुवारी छापा टाकून प्रकाश जयसिंगानिया तसेच विपिन भटीजा यांच्याकडून सिगारेट जप्त केल्या.

# कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत शिक्षण परिषदेचे आयोजन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आज दिनांक 13 डिसेंबर 2025 रोजी सीआरसी 9 आधारवाडी अंतर्गत सीआरसीतील सर्व शाळांची शिक्षण परिषद संपन्न झाली. सदर शिक्षण परिषदेस कल्याण डोंबिवली महानगरपालिकचे शिक्षण अधिकारी विजय सरकटे, crc प्रमुख डॉ. अनिता तायडे आणि crc मधील सर्व मान्यवर मुख्याध्यापक उपस्थित होते, तसेच लाभ फाउंडेशनच्या फाउंडर फर्नांडिस मॅडम(मानसशास्त्र तज्ज्ञ) आणि मराठी सिने अभिनेत्री माधवी छाईलकर मॅडम ( घरोघरी मातीच्या चुली मालिकेतील कलाकार ) या आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. माधवी मॅडम यांनी आजच्या कौटुंबिक पद्धतीमध्ये आजीचे असणं कसे महत्वाचे आहे हे त्यांच्या आजी या मराठी चित्रपटाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवले त्याबाबत माहिती दिली तसेच फर्नांडिस मॅडम यांनी दिव्यांग मुले आणि सामान्य विद्यार्थी यांच्याशी संवाद कसा करावा हे प्रात्यक्षिकातुन स्पष्ट केले. अपर्णा हर्षे मॅडम, शारदा मंदिर प्राथमिक आणि त्यांची संपूर्ण टीम यांनी अतिशय उत्तमरितीने आजच्या कार्यक्रमाचे अत्यंत सकारात्मक, शिस्तबध्द नियोजन केले. अशाप्रकारे उत्साही आनंदी वातावरणात आजची शिक्षण परिषद संपन्न झाली.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगारांना 13 वर्षांनंतर न्याय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण** : महाराष्ट्र वीज मंडळातील कंत्राटी कामगारांच्या दीर्घ संघर्षाला अखेर यश आले आहे. तब्बल १३ वर्षांच्या लढ्यानंतर औद्योगिक न्यायालयाने राज्यातील २,२८५ कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच २०१२ पासूनची वेतन तफावत भरून काढण्याचे स्पष्ट निर्देशही वीज मंडळाला देण्यात आले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयानंतर उरण तालुक्यासह जिल्ह्यातील वीज कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. अनेक ठिकाणी कामगारांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला. दीर्घकाळ चाललेल्या अनिश्चिततेनंतर मिळालेल्या या न्यायामुळे हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

२०१२ पासून कायम नोकरीच्या मागणीसाठी आंदोलन, निवेदने व न्यायालयीन लढा सुरू होता. या काळात काही कामगारांचे निधन झाले, तर काही निवृत्त झाले, मात्र न्यायालयाने मयत व निवृत्त कामगारांच्या कुटुंबीयांनाही भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

कामगारांना दिलासा

या निर्णयामुळे कामगारांना निश्चित वेतन, पीएफ, वैद्यकीय सुविधा व नोकरीतील स्थैर्य मिळणार असून, हा निर्णय कंत्राटी कामगारांसाठी मैलाचा दगड ठरत आहे. न्यायालयीन आदेशानुसार वीज मंडळाने लवकरच कायमस्वरूपी नेमणुका प्रक्रिया सुरू करणे, २०१२ पासूनची वेतन तफावत अदा करण्याची योजना जाहीर करणे, मयत/निवृत्त कामगारांच्या कुटुंबीयांना भरपाई देणे या सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्या लागणार आहेत.

# डिजिटल अरेस्टचा नवा सापळा कल्याणमधील वृद्धेला ६३ लाखांचा फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याणमधील पारनाका भागात आपल्या कुटुंबीयांसमवेत राहणाऱ्या एका ६७ वर्षाच्या वृध्द महिलेला तुमचे एक बँक खाते गैरव्यवहार प्रकरणाशी जोडले गेले आहे. त्यात तुम्ही एक संशियत आहात. त्यामध्ये काही समाजकंटक मंडळी सहभागी आहेत. आम्ही तुच्यासह तुमच्या कुटुंबाला अटक करू शकतो, असे घाबरून सोडून तुमचे बँक खाते संरक्षित करण्यासाठी आम्ही तुम्हाला साहाय्य करणार आहोत, असे सांगून या वृध्द महिलेकडून गेल्या महिन्यात पंधरा दिवसाच्या कालावधीत एका भामट्याने ऑनलाईन व्यवहारातून एकूण ६३ लाख ५० हजार रूपये उकळले आहेत.

या वृध्देच्या तक्रारीवरून बाजारपेठ पोलिसांनी माहिती आणि तंत्रज्ञान कायद्याने गुन्हा दाखल करून घेतला आहे. गौरी उपेंद्र घारपुरे (६७) असे तक्रारदार वृध्द महिलेचे नाव आहे. त्या कुटुंबियांसह कल्याणमधील पारनाका येथील फडके रुग्णालयाजवळील एका बंगल्यात राहतात. गौरी घारपुरे यांचे आयसीआयसीआय बँकेत खाते आहे. त्या माध्यमातून ते आपले नियमित व्यवहार करत असतात.

# निंबवली-राया परिसरात समृद्धी महामार्गावर ‘इन-आऊट’ प्रवेशाची मागणी जोरात



**टिटवाळा गणपती, भातसा पर्यटन, ग्रामीण भागांना मिळणार मोठा दिलासा..**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प. मुंबई–नागपूर जोडणाऱ्या या अतिवेगवान द्रुतगती महामार्गाचा लाभ राज्यातील अनेक भागांपर्यंत पोहोचत असताना, कल्याण तालुक्यातील निंबवली आणि राया गावाजवळ मात्र येण्या-जाण्यासाठी प्रवेशबिंदू (इन-आऊट) उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मुंबईकडून नागपूरकडे जाणाऱ्या मार्गावरील सर्वात मोठा टोल नाका याच ठिकाणी उभारण्यात आलेला असतानाही, येथे वाहनांसाठी चढ-उतार पॉईंट न देणे हा अन्यायच असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. याबाबत भारतीय जनता पार्टी कल्याण तालुका ग्रामीण युवा मोर्चा उपाध्यक्ष अनिल केणे यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी निवेदनाद्वारे ही तातडीची मागणी केली आहे.

निंबवली-राया परिसर हा महत्त्वाच्या धार्मिक व पर्यटन स्थळांचा केंद्रबिंदू आहे. टिटवाळा श्री महागणपती देवस्थान येथे दररोज नाशिक, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो भाविक दर्शनासाठी दाखल होतात. तसेच खडवली-वाडा मार्गावरील भातसा नदी पर्यटन क्षेत्र, कल्याण-नगर महामार्ग, टिटवाळा-कळवा रिंगरूट, खडवली-नाशिक महामार्गावरून सर्वाधिक वाहतूक प्रवास होत असल्यामुळे समृद्धी महामार्गावर थेट प्रवेश उपलब्ध झाल्यास प्रवाशांना मोठी सुविधा मिळणार आहे.

लगतच्या ग्रामीण भागातील शेतीमाल वाहतूक, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, रोजगार व शिक्षणासाठी प्रवास करणारे नागरिकदेखील या सोयीमुळे वेगाने आणि सुरक्षितपणे गंतव्यस्थान गाठू शकतील. इतर तालुक्यांमध्ये महामार्गावर चढ-उतार मार्ग उपलब्ध करून देण्यात आले असताना, कल्याण तालुक्याची उपेक्षा का? असा सवाल देखील नागरिकांकडून विचारला जात आहे.

समृद्धी महामार्ग पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर येथे प्रवेश न दिल्यास वाहतूक व्यवस्थेवर दुष्परिणाम होण्याची शक्यता असल्याचे अनिल केणे यांनी निदर्शनास आणले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने या प्रस्तावाचा तातडीने सकारात्मक विचार करून निंबवली-राया टोल नाक्यावर इन-आऊट सुविधा सुरू करावी, अशी मागणी सातत्याने जोर धरत आहे

**समृद्धी महामार्गासाठी जमीन दिली; परंतु कल्याण ग्रामीणला इन–आऊटची सुविधा तातडीने उपलब्ध करा – बाधित ग्रामस्थांची मागणी**

समृद्धी महामार्ग हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असून, हा महामार्ग ठाणे जिल्ह्यातून भिवंडी, कल्याण आणि शहापूर तालुक्यांच्या हद्दीतून जातो. मात्र या नियोजनात कल्याण ग्रामीण तालुक्याला इन–आऊटची जोडणी न दिल्याने विकासाला मर्यादा येत आहेत, अशी ग्रामस्थांची खंत आहे.

ग्रामस्थ म्हणतात की, “महामार्गासाठी आमच्या भागातील अनेक गावांची जमीन शासनाला दिली. कोणताही विरोध न करता विकासाच्या आशेने जागा उपलब्ध करून दिली. त्या बदल्यात टोल भरूनही महामार्गाचा लाभ घेता येईल अशी आशा होती. सुरुवातीला इन–आऊटचा मार्ग दाखवला गेला; पण नंतर तो बंद ठेवण्यात आला. त्यामुळे ग्रामीण परिसराच्या प्रगतीला अडथळा निर्माण झाला आहे.”

कल्याण ग्रामीण परिसर धार्मिक, सांस्कृतिक व पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. येथे असलेले टिटवाळा महागणपती हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. महाराष्ट्रासह इतर अनेक राज्यांतून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी टिटवाळ्यात येतात. परंतु, महामार्गाची थेट जोडणी नसल्याने भाविक, व्यावसायिक आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

**“इन–आऊट सुविधा सुरू झाली, तर टिटवाळा परिसराचा पर्यटन विकास, उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी वाढतील. कल्याण ग्रामीण हा राज्यातील आणि देशातील प्रमुख वाहतुकीच्या नकाशावर येईल, जमीन आम्ही दिली... आता विकासाची दारे उघडणे शासनाची जबाबदारी आहे.”**

**- भारतीय जनता पार्टी कल्याण तालुका ग्रामीण युवा मोर्चा उपाध्यक्ष अनिल केणे**

समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून राज्यातला प्रत्येक कोपरा जोडला जाईल या उद्दिष्टात कल्याण ग्रामीणचाही समावेश तातडीने व्हावा, अशी मागणी जोर धरत आहे.






# साथी पोर्टल कार्यप्रणाली व कीटकनाशक हाताळणीविषयी प्रशिक्षण कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कृषी विभाग, जिल्हा परिषद ठाणे , कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी सेवा केंद्र चालक, गुणनियंत्रण निरीक्षक तसेच बियाणे उत्पादक कंपन्यांसाठी आयोजित करण्यात आलेले साथी पोर्टल कार्यप्रणाली आणि कीटकनाशकांच्या सुरक्षित हाताळणी व फवारणीविषयीचे प्रशिक्षण दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी बी. जे. हायस्कूल येथे यशस्वीपणे पार पडले.

मा. कृषी आयुक्त यांच्या आदेशानुसार जिल्हाभरातील कृषी सेवा केंद्रांच्या कामकाजात डिजिटल प्रणालीचा अधिक कार्यक्षम वापर व्हावा तसेच शेतकऱ्यांपर्यंत सुरक्षित व गुणवत्तापूर्ण कृषी सेवा पोहोचाव्यात, या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणास कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर, मोहीम अधिकारी महेश बनकर,



जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बालाजी शिंदे, जिल्हा व्यवस्थापक, RCF विकास कांबळे, स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेड उत्तम मगर, दीपक कोळी, हेमंत सूर्यवंशी, प्रतिनिधी, व्हिजन टेक सुहास पाटील, अध्यक्ष, ठाणे जिल्हा ॲग्रो डीलर्स असोसिएशन समीर ठाकरे, तालुकास्तरावरील गुणवत्ता नियंत्रण विभागातील अधिकारी, जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्रांचे प्रतिनिधी व विक्रेते उपस्थित होते.

**साथी पोर्टल कार्यप्रणालीवर मार्गदर्शन**

मोहिम अधिकारी श्री. महेश बनकर यांनी साथी पोर्टलवरील बियाणे साठवणूक, वितरण, विक्री प्रक्रियेची पद्धत याबाबत PowerPoint प्रेझेंटेशनद्वारे सविस्तर माहिती दिली.

तसेच, बियाणे विक्री करताना येणाऱ्या अडचणी, पोर्टलवरील नोंदी कशा योग्यरीत्या कराव्यात, प्रणालीतील सामान्य समस्यांचे निराकरण, रब्बी व खरीप हंगामासाठी बियाणे विक्री करताना घ्यावयाची दक्षता याबाबत तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आले.POS मशीनद्वारे खत विक्रीचे प्रात्यक्षिक व्हिजन टेकचे प्रतिनिधी सुहास पाटील यांनी POS मशीनवर खत विक्री करताना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर प्रात्यक्षिक दिले. POS प्रणालीचा योग्य वापर करून पारदर्शक व अचूक खत-वितरण कसे करावे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

**कीटकनाशक हाताळणी व फवारणीबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन**

स्पेक्ट्रम इथर्स लिमिटेडचे प्रतिनिधी हेमंत सूर्यवंशी यांनी कीटकनाशकांची सुरक्षित साठवणूक, फवारणी करताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी, वैयक्तिक संरक्षण साधनांचा वापर, अति, चुकीचा किंवा अनधिकृत कीटकनाशकांचा वापर टाळणे, वातावरण, वारा, तापमान यांचा फवारणीवरील परिणाम, दुर्घटना टाळण्यासाठी महत्त्वाचे सुरक्षा नियम या मुद्द्यांवर सविस्तर माहिती दिली.कृषी विकास अधिकारी मुनीर बाचोटीकर यांनी उपस्थित विक्रेत्यांना युरिया खत फक्त शेतकऱ्यांनाच विकावे, गैरशेती वापरासाठी खत विक्री आढळल्यास रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल, अशा सुचना दिल्या. तसेच कोकणातील पिकांसाठी शासन प्रमाणित कीटकनाशकेच विक्री करावीत. विक्री केंद्रांमध्ये कीटकनाशकांचा साठा सुरक्षित आणि नियमांनुसार ठेवावा असे मार्गदर्शन ही यावेळी केले.

**घडीपत्रिका व माहिती पुस्तिका विमोचन**

या कार्यशाळेत शेतकऱ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या ‘कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी’ या घडीपत्रिका व साथी पोर्टल माहिती पुस्तिकेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान सर्व विक्रेत्यांना फवारणी किट देखील वितरित करण्यात आले.

कार्यशाळेचे सुत्रसंचालन बी. डी. जावीर यांनी केले, तर भगवान पथारे, कृषी अधिकारी, शहापूर यांनी आभार प्रदर्शन केले. उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, विक्रेते आणि कृषी सेवा केंद्र प्रतिनिधींचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राष्ट्रवादीच्या वतीने विविध स्पर्धांतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कल्याण (पूर्व) विधानसभा क्षेत्र विधानसभा अध्यक्ष विक्रांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिना निमित्त शालेय निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, रिलस्पर्धा ऑनलाइन आयोजित करण्यात आली होती. तसेच स्त्री सशक्तीकरण या विषयावर कोळशेवाडी पोलिस स्टेशनच्या रूपाली पाटील यांनी तसेच एडवोकेट रेश्मा सांगळे यांनी महिलांना येणाऱ्या समस्येबाबत कायदे विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रशस्तीपत्र व पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सत्कार करण्यात आला.तसेच कल्याणचे सुपुत्र काशिनाथ सांगळे यांनी दुबई येथे स्काय डायव्हिंग करून भारताचे नाव रोशन केल्याबद्दल त्यांचा सत्कार राष्ट्रवादीच्या वतीने विक्रांत शिंदे यांच्याहस्ते करण्यात आला. याप्रसंगी ठाणे जिल्ह्याच्या निरीक्षक माया कटारीया, विधानसभा अध्यक्ष विक्रांत शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष वर्षा कळके, जिल्हा सरचिटणीस मनोज नायर, भावेश सोनवणे, महिला अध्यक्ष राजश्री फुलपगार, हरिश्चंद्र शेळके, कमलाकर चंदने, भय्यू शिर्के, गणेश विद्या मंदिर मधील मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका व इतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी याप्रसंगी उपस्थित होते.

# जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची टिटवाळा महोत्सव मध्ये चमकदार कामगिरी


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** मुंबई नगरी पासून जवळ असलेले तसेच श्री महागणपतीच्या पवित्र तीर्थक्षेत्रामुळे प्रसिद्धस आलेले टिटवाळा शहर; या टिटवाळा शहरांमध्ये रोजगारासाठी अनेक ठिकाणाहून स्थलांतरीत झालेले अनेक लोक येऊन राहत आहेत. रेल्वेच्या प्रवासामुळे लोकवस्ती ही मागील दहा वर्षाच्या तुलनेत झपाट्याने वाढताना दिसत आहे. येथील नागरिकांचे मनोरंजन व रोजच्या धावपळीच्या जीवनातून विरंगुळा मिळावा




म्हणून गेले दहा वर्षे सलग श्री. विजय देशोकर यांच्यामार्फत टिटवाळा महोत्सवाचे आयोजन हे करण्यात येते. यामध्ये विविध खाद्यपदार्थ, खेळणी ,पाळणे साहसी खेळ, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी ही पहावयास मिळते. शुक्रवार दिनांक १२- १२- २०२५रोजी कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती. रविंद्र घोडविंदे यांनी या महोत्सवाला भेट देत विजय देशोकरांना या महोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. जीवनदीप महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सहभाग घेत सादरीकरण केले. या भव्य दिव्य महोत्सवात महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ ,उपप्राचार्य .हरेंद्र सोष्टे , सांस्कृतिक विभाग प्रमुख. प्रा. सतीश लकडे, प्रा. डॉ.राहुल तौर, प्रा. गणेश केमारे, प्रा. मोहन गारे, प्रा. महेश थोरात, प्रा. निलेश कुंभार हे या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी ,विद्यार्थी यांच्या एकत्रित सहभागाने सदर कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

# ठाणे शहरात आणखी चार दिवस 50 टक्के पाणी कपात



## नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसे बंधारा येथून टेमघर जलशुद्धीकरण केंद्राकडे पाणी वाहून आणणारी १००० मि. मि व्यासाची जलवाहिनी कल्याण फाटा येथील महानगर गॅस च्या कामांमध्ये गुरुवार दि. ११. १२. २०२५ रोजी दुपारी दुसऱ्या ठिकाणी पुन्हा नादुरुस्त झाली आहे. पाणीपुरवठा विभागामार्फत जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे , मात्र जलवाहिनी जुनी व प्रिस्ट्रेस कॉंक्रीट पद्धतीची असल्यामुळे दुरुस्तीच्या कामासाठी अजून चार दिवस वेळ लागण्याची शक्यता आहे. या कारणामुळे ठाणे शहरात होणारा पाणीपुरवठा कमी झाला असून शहरांमध्ये ५० टक्के पाणी कपात लागू करण्यात येत आहे.

शहरामध्ये पाणी वितरणाचा समतोल ठेवण्यासाठी दि. १५. १२. २०२५ पर्यंत प्रत्येक भागास दिवसातून १२ तास झोनिंग पद्धतीने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना कमी प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल.

तरी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा व महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे.

# मातोश्री आनंदीबाई पाटील ग्रंथालय आवारात बालकांचे मोफत लसीकरण



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** दिनांक 13 डिसेंबर 2025 रोजी दहा ते चार वाजेपर्यंत डोंबिवली पूर्वेकडील सुनील नगर येथील मातोश्री आनंदीबाई ग्रंथालय आवारात प्रभागातील बालकांसाठी मोफत लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिवसेनेचे माजी नगरसेवक नितीन पाटील, शिवसेना संघटक कल्याण ग्रामीण, सौ.रंजना नितीन पाटील, माजी नगरसेविका. माजी नगरसेविका सौ रुपाली रवी म्हात्रे रवी म्हात्रे, माजी नगरसेवक रवी पाटील. यांच्या प्रयत्नाने प्रभागातील बालकांसाठी हे मोफत लसीकरण शिबिर आयोजित केले होते. सदर शिबिरात दत्तनगर आरोग्य केंद्रातून वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अर्ध्यवर्यु. गौरकर मॅडम, अश्विनी साळुंखे, शीला जोंधके नेहा राठोड, वैशाली निकम, स्टाफ तर्फे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

# भाल येथे हरीनाम सप्ताहाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नेवाळी :** कल्याण श्रीमलंग रोडवरील भाल येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदीरात ११ डिसेंबर ते १४ डिसेंबर पर्यंत हरीनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन केले आहे.

दररोज पहाटे ४ ते ६.काकडा भजन सकाळी ८ ते १२ ज्ञानेश्वरी पारायण दु ४ ते ५ प्रवचन ,सायं ५ ते ६ सामुदाईक हरीपाठ ,सायं, ७ ते ९ हरी कीर्तन व रात्रौ ९ ते ११ भजन असे कार्यक्रम आहेत.

प्रवचन कार्यक्रमात अनुक्रमे हभप जनार्दन महाराज मढवी,हभप बळीराम महाराज मढवी,हभप निलेश महाराज म्हात्रे सर(भाल) यांचे प्रवचन "तर,हरी कीर्तन कार्यक्रमात हभप.डॉ.चैतन्य आनंदमहाराज खंडागळे (आनंद आश्रम चौक रायगड) हभप श्री विक्रांत महाराज पौडेकर (जोग



महाराज वारकरी शिक्षण संस्था देवाची आळंदी) हभप श्री दिपक महाराज मेटे शास्त्री (विश्व वारकरी संघ तालुका उपाध्यक्ष केज बीड) यांची कीर्तन सेवा होणार असून दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ समाज प्रबोधनकार हभप श्री चंद्रकांत महाराज खळेकर( खडांबेकर )यांची काल्याची कीर्तन सेवा, आभार प्रदर्शन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# शिक्षण परिषदेत शिक्षकांना दिले सकारात्मक शिस्तीचे धडे



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** शिक्षण हक्क कायदा 2009 नुसार विद्यार्थ्यांना शिक्षा करण्यास प्रतिबंधित करण्यात आलेले आहे. मात्र राज्यात काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शिक्षा केल्यामुळे मृत्यू अथवा इतर गंभीर दुखापत झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्या अनुषंगाने शिक्षण मंत्री यांच्या निर्देशाने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे यांचे सूचनानुसार केंद्रस्तरावरून शिक्षण परिषदेमध्ये सकारात्मक शिस्त या विषयावर विषय सत्र आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

याचे औचित्य साधून आणि ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने सर्व मनपा, अनुदानित, विनाअनुदानित, सेल्फ फायनान्स प्राथमिक, माध्यमिक शाळा व मनपा बालवाडी शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांना सहभागी होण्यासाठी गट क्रमांक 2 व 4 च्या वतीने ठामपा शाळा क्रमांक 33, किसन नगर, ठाणे येथे दि.12 डिसेंबर 2025 रोजी तर लिटिल फ्लॉवर स्कुल, ठाणे येथे दि.13 डिसेंबर 2025 रोजी शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या शिक्षण परिषदेमध्ये सकारात्मक शिस्त व विद्यार्थी सुरक्षितता, डॉ जयंत नारळीकर गणित विज्ञान समृद्ध अध्ययन, निपुण महाराष्ट्र कार्यक्रम, मूल्यमापन विकसन गट निर्मिती, स्वच्छ, सुंदर,हरित विद्यालय, बिल्डथॉन,

## विद्यार्थ्यांना शिक्षा केल्यामुळे मृत्यू अथवा इतर गंभीर दुखपतीची दखल घेऊन शिक्षण परिषदेचे आयोजन

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या विषयावर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.


यावेळी गटप्रमुख राजेंद्र परदेशी यांनी PPT च्या माध्यमातून विषयाची सखोल व प्रभावी मांडणी करत शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या सादरीकरणास उपस्थित शिक्षकांकडून विशेष शंकांचे माध्यमातून दाद मिळाली. यावेळी खान अकॅडमी रजिस्ट्रेशन संदर्भात शर्मा मॅडम व प्रतिमा आहेर यांनी उपयुक्त सादरीकरण करून डिजिटल शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत मासिक मूल्यमापनाबाबत CRC समन्वयक अरुंधती डोमाळे यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच CRC समन्वयक आशा पाटे यांनी स्वच्छ सुंदर हरित विद्यालय उपक्रमाची माहिती दिली, तर CRC समन्वयक नफीसा मॅडम यांनी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानावर सखोल चर्चा घडवून आणली.शिक्षण परिषदेत CRC समन्वयक निलिमा पाटील यांनी प्रशासकीय बाबींची माहिती देत आभार प्रदर्शन केले. संपूर्ण शिक्षण परिषदेचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक दिपक मोराणकर यांनी केले.

# टिटवाळयात अपघातांचे सत्र सुरूच
# गोवेली रोडवर महिलेचा बळी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** टिटवाळा शहरासह लगतच्या परिसरात अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून, शनिवारी (दि. १३ डिसेंबर) सकाळी गोवेली रोडवरील जीवदानी धाब्याजवळ झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सकाळी सुमारे सातच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

नेहमी प्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉकला निघालेल्या ५२ वर्षी सुरेखा गोपीनाथ खंडागळे(रा. नक्षत्र बिल्डिंग, टिटवाळा–गोवेली रोड) यांच्यावर आज काळाने घाला घातला. टिटवाळ्याहून गोवेलीच्या दिशेने भरधाव जाणाऱ्या पिकप टेम्पोने मागून धडक देत सुरेखा यांना काही अंतरा पर्यंत फरफरट नेले. त्या टेम्पोच्या मागच्या टायर खाली अडकल्याने या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर त्यांना तातडीने रुक्मिणी हॉस्पिटल, कल्याण येथे हलविण्यात आले; मात्र वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयत खंडागळे कुटुंबावर आधीच संकटांचे सावट असून, त्यांच्या पतींवर फोर्टीज रुग्णालयात



डायलिसिस सुरू असल्याची माहिती आहे. त्यामुळे या घटनेने कुटुंबावर दुहेरी आघात झाला आहे.

दरम्यान, टिटवाळा हद्दीत मागील काही दिवसांत अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. अवघ्या दोन दिवसांपूर्वी वृंदा रोड परिसरात टाटा नेक्सन कारच्या धडकेत दोन जणांचा मृत्यू झाला होता; यात एका लहान मुलाचाही दुर्दैवी अंत झाला. याशिवाय धर्मवीर आनंद दिघे मार्गावर रिक्षाच्या धडकेत लक्ष्मण पाटील व त्यांच्यासोबत असलेले ७५ वर्षीय नागरिक गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सलग घडणाऱ्या या दुर्घटनांमुळे टिटवाळा परिसरातील वाहतूक व्यवस्थेची पोलखोल झाली आहे. खराब व खड्डेमय रस्ते, वेगमर्यादेचे उल्लंघन, अपघातप्रवण रस्ते, अपुरी

## सलग दुर्घटनांनी नागरिकांत दहशत सीसीटीव्ही, कडक वाहन तपासणी व वाढीव वाहतूक पोलिसांची जोरदार मागणी

वाहतूक नियंत्रण यंत्रणा आणि पोलिसांची कमी उपस्थिती ही अपघातांची प्रमुख कारणे असल्याचा ठपका स्थानिक नागरिक ठेवत आहेत. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र संतापासह भीतीचे वातावरण पसरले आहे. या पार्श्वभूमीवर अपघातप्रवण व वर्दळीच्या ठिकाणी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, आरटीओकडून वाहनांची नियमित व कठोर तपासणी व्हावी, तसेच वाहतूक पोलिसांची संख्या वाढवावी अशी ठोस मागणी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक प्रतिनिधींनी केली आहे. प्रशासनाने वेळीच ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात आणखी जीव गमावण्याची वेळ येऊ नागरिकांवर शकते, अशी भीती व्यक्त होत असून अपघातांचे हे सत्र रोखण्यासाठी तात्काळ कृतीची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आयोजित
# संदप गावात भव्य महाआरोग्य शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** 27 गावातील कल्याण शिळ रोड येथील संदप या गावी शिवसेना वैद्यकीय कक्ष आयोजित भव्य मोफत महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्रभाग क्रमांक 30 मधील शिवसेना कल्याण ग्रामीण तालुकाप्रमुख अर्जुन बाबु पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संदप गावातील दत्त मंदिर येथे हे मोफत महाआयोग्य शिबिराचे आयोजन केले होते या शिबिरात नेत्र तपासणी ,चष्मे वाटप, आणि मोतीबिंदू ऑपरेशन, तसेच ऍन्जिओग्राफी एन्जोप्लास्टी, हाडांचे विकार, सर्दी खोकला, आणि इसीजी, बालरोग , स्त्रीरोग, तपासणी आणि यावरील सर्व प्रकारचे औषधे रुग्णांना मोफत दिली जात आहे. अर्जुन पाटील हे कल्याण ग्रामीणचे एक भारदस्त शांत आणि विचारी



स्वभावाचे व्यक्तिमत्व असून ते नेहमीच लोक उपयोगी अनेक कार्यक्रम अनेक वर्षापासून करीत आले आहे कधी महिलांना साड्या वाटप मुलांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप तर ज्येष्ठांना उपयोगी असणारे उबदार कपड्यांचे वाटप असे हे नेहमीच कार्यक्रम करत असतात त्यांच्या गावात होत असणारा तुलसी विवाह या कार्यक्रमाला तर अनेक पक्षाचे अनेक दिग्गज लोक येऊन हजेरी लावतात. या मोफत महाआरोग्य शिबिरात अर्जुन पाटील यांच्याबरोबर अनिल म्हात्रे, नितीन माळी, दिलखुश माळी एडवोकेट ब्रह्मा माळी, महेश पाटील, प्रकाश म्हात्रे, असे अनेक त्यांच्या विश्वासू पदाधिकारी, आणि कार्यकर्ते त्यांच्या खांद्याला खांदा घेऊन कार्य करीत होते या सर्वांच्या प्रयत्नाने हे आरोग्य शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.

# सिलिंडरची चोरी करणाऱ्यास अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे :** कळवा भागातील गृहसंकुलांमध्ये डिलिव्हरीसाठी असलेल्या सात गॅस सिलिंडरची चोरी करणाऱ्या सागर पाटील (२५) या सराईत चोरट्याला अटक केल्याची माहिती कळवा पोलिसांनी शुक्रवारी दिली. त्याच्याकडून चोरीतील १७ हजार ५०० रुपयांचे सात सिलिंडर हस्तगत केले. त्याच्याकडून नवी मुंबईतील रिक्षा चोरीचाही गुन्हा उघडकीस आला आहे. कळव्यातील भारत गॅस कंपनीतील सिलिंडर डिलिव्हरी करणारा कामगार ३० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी एकच्या सुमारास शंकर मंदिराजवळील राणा टॉवर येथे सिलिंडर डिलिव्हरीसाठी गेला होता. त्याचवेळी अज्ञात चोरट्याने त्यांच्या टेम्पोतून या सात सिलिंडरची चोरी केली. याप्रकरणी २ डिसेंबर रोजी कळवा पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला होता.

# भुवनपाडा परिसरात बिबट्याचा वावर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** सध्या महाराष्ट्रात बिबटया या प्राण्याने धुमाकूळ घातला असून संसदेपासून ते महाराष्ट्राच्या विधीमंडळात बिबट्या गाजत आहे. बिबट्या मानवी वस्तीत येऊ नये म्हणून वनमंत्री गणेश नाईक यांनी अफलातून घोषणा केली असली तरी आजपर्यंत बिबट्याची शिकार होऊन अनेक निरपराध नागरिकांचे जिव गेले आहेत ही एक मोठी चिंतनिय बाब आहे. यात लहान बालकांचा जास्त समावेश आहे.

मुरबाड तालुक्यातही अधून मधून बिबट्याचे दर्शन नागरिकांना होत असून



अनेक ठिकाणी कुत्री, कोंबड्या, शेळया फस्त केल्याच्या घटना घडल्या आहेत.

भुवनपाडा येथेही दोन दिवसापूर्वी बिबट्याचा वावर असल्याचे येथील ग्रामस्थांचे म्हणने असून काहींच्या दृष्टीस पडला असल्याचे सांगितले आहे.याबाबत पुढील दक्षतेसाठी मुरबाड वनविभागाला कळविले असून मुरबाड वनकर्मचारी यांनी ग्रामस्थांना धीर देत काही सुचना करून जनजागृती केली आहे. याजबरोबर कमेरासुद्धा लावला असून रात्री शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे, लहान मुलांना अंगणात एकटे सोडू नये, महिलांनी शेतावर एकटे जाऊ नये तसेच आपली काळजी घ्यावी. संध्याकाळी फटाके फोडावेत अशा सुचना केल्या असून पून्हा आढळल्यास त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.

# कामगारांच्या निलंबनामुळे तब्बल तेरा दिवस टेक्नोक्राप्ट कामगारांचे आंदोलन सुरूच

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड मधील धानिवली येथिल टेक्नोक्राप्ट कंपनी व्यवस्थापनाने कोणतेही ठोस कारण नसतानाही ज्ञानेश्वर घावट व संतोष राऊत या दोन कायमस्वरूपी कामगारांना निलंबित केले असल्यामुळे कंपनी व्यवस्थापनेच्या या अनागोंदी व अरेरावीपणा विरोधात 120 कामगार 1डिसेंबर पासून बेमुदत संपावर गेले आहेत. यामध्ये कायमस्वरूपी दोन व कंत्राटी दहा असे बारा कामगारांना ठोस कारण नसतानाही कंपनी प्रशासनाने निलंबित केले आहे.

कंपनीच्या या मनमानी कारभारा



विरोधात सर्व कामगार एकवटले असून आमची कोणतीही मागणी नसताना व आमच्या हातून कोणतीही चुक नसताना कंपनीने कामगार कायद्याचे नियम धाब्यावर बसवून आमचे निलंबन केले असल्याने कामगार एकवटले आहेत. दरम्यान कामगार आयुक्त कल्याण यांच्या कार्यालयाकडून ही कामगारांच्या बाजूने ठोस आश्वासन मिळत नसल्याने

## कंपनी व्यवस्थापनाची अरेरावी

अजून कीती दिवस हे कामगार रस्त्यावर,कडाक्याच्या थंडीत, कुटुंबापासून काढणार असून विशेष म्हणजे हे सर्व कामगार स्थानिक आहेत. 20 ते 22 वर्ष या कंपनीत काम करून आज रस्त्यावर येण्याची वेळ आली असून कंपनी व्यवस्थापनाने स्थानिक कामगारांचा विचार करून चर्चा करावी कामावर घ्यावे अशी मागणी सर्व कामगार करत आहेत.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024